# सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन




## आपल्या भावनांना आपल्या गुंतवणुकीवर वरचढ होऊ देऊ नका

Wiseinvest®
AMFI-registered Mutual Fund Distributor

## सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन म्हणजे काय?

सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (SIP) मध्ये, तुम्ही म्युच्युअल फंडांमध्ये एका शिस्तबद्ध रीतीने गुंतवणूक करता. बँकेतल्या रिकरिंग डिपॉझिट (RD) प्रमाणेच ही गुंतवणूक केल्यासारखे आहे. एसआयपीसाठी गुंतवणूक करून तुम्ही ठरावीक कालांतरासाठी एक ठरावीक रक्कम, निश्चित काळासाठी एखाद्या पूर्वनिश्चित फंडामध्ये गुंतवता.

## सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन कशासाठी?

एसआयपीद्वारा गुंतवणूक करणे हे एक अतिशय परिणामकारक धोरण (strategy) आहे, ज्याद्वारे तुम्ही तुमच्या घरी नेत असलेल्या पगाराच्या विशिष्ट टक्के रक्कम गुंतविण्याची बांधिलकी स्वीकारता आणि तुम्ही कमवताना बचतही करण्याची खात्री करता. या शिवाय, दरमहा गुंतवणूक करण्याची बांधिलकी असल्याने निर्णय प्रक्रियेमधील भावनात्मक भाग कमी होतो. शेअर बाजाराची स्थिती कशी आहे त्यानुसार ह्या भावना ''हाव'' ते ''भीती'' अशा दोन टोकांदरम्यान हेलकावे खात असतात आणि त्यामुळे योग्य गुंतवणूक निर्णय घेणे बहुधा अवघड होते. एसआयपीद्वारा संक्रामित होणारा शिस्तबद्ध गुंतवणुकीचा मार्ग स्वीकारून तुम्ही बाजाराच्या विविध पातळ्यांविषयी चिंता करण्यापेक्षा, त्यानुसार गुंतवणूक करून ''सरासरी''(averaging) च्या तत्त्वानुसार बाजारातील अस्थिरतेपासून लाभ उठवू शकता.

मात्र ह्या विलक्षण प्रक्रियेच्या खऱ्या सामर्थ्याचा लाभ घेण्यासाठी ''काय करावे'' व ''काय करू नये'' यासाठी काही नियमांचे पालन करावे लागते :

## काय करावे

**गुंतवणुकीची सुरुवात लवकर करा -** एसआयपीद्वारा लवकर गुंतवणूक सुरू करणे अतिशय महत्त्वाचे आहे कारण, त्यामुळे आपण दीर्घकाळ गुंतवणूक करू शकतो आणि ''चक्रवाढीच्या ताकदी'' पासून लाभ घेऊ शकतो. लक्षात ठेवा, तुमच्या गुंतवणुकीस उशीर करणे फार महागडे ठरू शकते. कसे ते पुढील तक्त्यामध्ये पहा :

| | | गृहीत धरलेले उत्पन्न १२% दराने<br>रु.१०००० ची मासिक एसआयपी |
|---|---|---|
| **वय** | **गुंतवणूक करावयाच्या वर्षांची संख्या** | **संचयित निकाय (कोटींमध्ये)** |
| २५ | ३५ | ६.५० |
| ३० | ३० | ३.५३ |
| ३५ | २५ | १.९० |
| ४० | २० | १.०० |
| ४५ | १५ | ०.५० |
| ५० | १० | ०.२३ |

**येथे दर्शविलेली मूल्ये केवळ निर्देशनात्मक उद्देशासाठी आहेत. हमीप्राप्त उत्पन्न म्हणून त्यांचा विचार करू नये.**

ज्या कोणाला गुंतवणूक करण्यासाठी १० वर्षे उशीर होईल, म्हणजे वयाच्या २५ ऐवजी ३५ व्या वर्षी जो गुंतवणूक सुरू करील, त्याचा संचयित निकाय रु१.९० कोटी असेल, पण जर त्याने २५ व्या वर्षी गुंतवणुकीस सुरुवात केली असती, तर त्याच्या कडे रु.६.५० कोटी असते, हा फरक सुमारे १/३ आहे!! म्हणूनच, जर तुम्ही एसआयपीद्वारा गुंतवणुकीस सुरुवात केली नसेल तर आता सुरुवात करा, कारण 'खूप उशीर झाला' असे कधीच होत नाही.

**पारंपारिक पर्यायांच्या पलिकडे पहा** - जर तुम्ही तुमच्या पैशाचा मोठा हिस्सा एखाद्या बँकेत रीकरिंग/ फिक्स्ड डिपॉझिटमध्ये गुंतवत असाल, तर त्यापलिकडे जाउन म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करण्याची वेळ आता आलेली आहे, कारण एकूण उत्पन्न तसेच करपश्चात उत्पन्न जास्त देण्याची त्यांची क्षमता आहे. बाजार-संलग्न उत्पादने असल्याने तत्संबंधी जोखमीही असतात ह्यात शंका नाही. तथापि, योग्य मालमत्ता वर्गात म्हणजे इक्विटी, ऋण किंवा हायब्रीड अशा साधनांमध्ये योग्य फंडांमध्ये गुंतवणूक आणि तीही शिस्तबद्ध रीतीने करण्याचा पर्याय स्वीकारून तुम्ही करपश्चात उत्पन्न जास्त मिळवू शकता. जगभरात म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करून गुंतवणूकदारांना लाभ होत आहे. आता पाळी तुमची आहे!

**तुमची गुंतवणुक तुमच्या उद्दिष्टांना अनुसरून करा** - लहान लहान हप्त्यांनी, कालांतराने मोठा निकाय (corpus) तयार करण्यासाठी एसआयपी हे एक उत्तम साधन असले, तरी तुमच्या गुंतवणुकीला काही हेतू असणे महत्त्वाचे आहे. आपल्या सर्वांनाच गुंतवणुकीतून काही उद्दिष्टे (goal) साध्य करायची असतात, उदाहरणार्थ; घर खरेदी करणे, मुलांच्या लग्नासाठी आणि शिक्षणासाठी तरतूद, पर्यटनाला जाणे, सुखाने निवृत्त होता यावे म्हणून एखादा निवृत्ती-निधी उभारणे वगैरे.

तुमची उद्दिष्टे निश्चित करून, त्यासाठी कालक्षितिज म्हणजे मुदत नक्की करून आणि एकूण निधीची लक्ष्य रक्कम ठरवून नेमक्या कोणत्या मालमत्ता वर्गात गुंतवणूक करावी तसेच लक्ष्य साध्य करण्यासाठी दरमहा किती गुंतवणूक करावी हे गणित करता येते. तसेच सर्व उद्दिष्टांसाठी एकच संच तयार करण्यापेक्षा, तुमच्या प्रत्येक उद्दिष्टासाठी एक स्वतंत्र निवेशसंच उभारा. असे केल्याने, प्रगतीवर लक्ष ठेवणे सोपे तर होईलच शिवाय ज्या उद्दिष्टासाठी पैसे बाजूला काढले आहेत, त्यासाठीच ते वापरले जात आहेत ह्याची खात्री राहील.

असं समजूया, की तुमच्या मुलाच्या शिक्षणासाठीचं नियोजन तुम्ही त्याच्या जन्मापासून सुरू करीत आहात. तुमच्या आयुष्यातलं हे महत्त्वाचं उद्दिष्ट गाठायला तुमच्याकडे सुमारे १८ वर्षांचा कालावधी आहे. जर, शिक्षणाचा सध्याचा खर्च रु.५० लाख असेल आणि महागाईचा वार्षिक दर १०% मानला तर, तुमचे मूल १८ वर्षांचे होईल तेव्हा, तुम्हाला रु.२.७८ कोटींची गरज भासेल. जर तुम्ही इक्विटी फंडांमध्ये गुंतवणूक केलीत तर हे लक्ष्य साध्य करण्यासाठी (वर्षिकीकृत उत्पन्न १२% दराने गृहीत धरून) दरमहा एसआयपीद्वारा ३६००० रुपये गुंतविणे आवश्यक आहे. तुम्ही गुंतवणूक करण्यास कधी सुरुवात करता, ह्यानुसार तुम्ही किती गुंतवणूक करणे आवश्यक आहे, हे खालील तक्त्यामध्ये स्पष्ट केलेले आहे.

# उद्दिष्ट : अपत्याचे शिक्षण



| शिक्षणाचा सध्याचा खर्च ५० लाख | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आवश्यक एसआयपी (रु.) आणि अपेक्षित उत्पन्न दर | | |
| अपत्याचे वय | शिक्षणखर्च सुरू होण्यासाठी वर्षे | मूल त्या वयात आल्यावर आवश्यक शिक्षणखर्च (कोटींमध्ये)* | ८% | १०% | १२% |
| ० | १८ | २.७८ | ५८००० | ४६००० | ३६००० |
| ५ | १३ | १.७३ | ६३००० | ५४००० | ४६००० |
| १० | ८ | १.०८ | ८०००० | ७३००० | ६७००० |
| १५ | ३ | ०.६६ | १६२००० | १५७००० | १५२००० |

* शैक्षणिक महागाईचा दर @ १०%

**येथे दर्शविलेली मूल्ये केवळ निर्देशनात्मक उद्देशासाठी आहेत. हमीप्राप्त उत्पन्न म्हणून त्यांचा विचार करू नये.**

त्याचप्रमाणे, इतर दीर्घकालीन उद्दिष्टांसाठी म्हणजे मुलाचे/मुलीचे लग्न आणि निवृत्तीच्या नियोजनासाठीही तुम्हाला लवकर आणि शिस्तबद्ध रीतीने निश्चित कालक्षितिजात गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

# उद्दिष्ट - अपत्याचे लग्न



| लग्नाचा सध्याचा खर्च २५ लाख | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आवश्यक एसआयपी (रु.) आणि अपेक्षित उत्पन्न दर | | |
| अपत्याचे वय | लग्न होण्यासाठी वर्षे | मूल त्या वयात आल्यावर लग्नाचा आवश्यक खर्च (कोटींमध्ये)* | ८% | १०% | १२% |
| ० | २५ | १.३५ | १४००० | १०००० | ७००० |
| ५ | २० | ०.९६ | १७००० | १३००० | १०००० |
| १० | १५ | ०.६९ | २०००० | १७००० | १४००० |
| १५ | १० | ०.४९ | २७००० | २४००० | २२००० |

* महागाईचा दर - @ ७%

**येथे दर्शविलेली मूल्ये केवळ निर्देशनात्मक उद्देशासाठी आहेत. हमीप्राप्त उत्पन्न म्हणून त्यांचा विचार करू नय.**

# उद्दिष्ट : निवृत्तीसाठी नियोजन



| सध्याचा मासिक खर्च रु. २०००० | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आवश्यक एसआयपी (रु.) आणि अपेक्षित उत्पन्न दर | | |
| वय | निवृत्तीसाठी बाकी वर्षे | ६० व्या वर्षी अपेक्षित मासिक खर्च (रु.)* | आवश्यक निवृत्ती निकाय (कोटींमध्ये) | ८% | १०% | १२% |
| ३० | ३० | १५३००० | ३.३३ | २३००० | १५००० | १०००० |
| ३५ | २५ | १०९००० | २.३७ | २५००० | १८००० | १३००० |
| ४० | २० | ७८००० | १.६९ | २९००० | २३००० | १७००० |
| ४५ | १५ | ५६००० | १.२० | ३५००० | २९००० | २४००० |
| ५० | १० | ४०००० | ०.८६ | ४७००० | ४२००० | ३८००० |

* महागाईचा दर -७%

आयुर्मान -८० वर्ष. अपेक्षित परतावा निवृत्ती नंतर - ८%

**येथे दर्शविलेली मूल्ये केवळ निर्देशनात्मक उद्देशासाठी आहेत. हमीप्राप्त उत्पन्न म्हणून त्यांचा विचार करू नये.**

**वृद्धि पर्याय स्वीकारा** - चक्रवाढीची शक्ति तुम्ही दीर्घमुदतीसाठी गुंतवणूक करता तेव्हा चांगली प्रकट होते. होणारे लाभ तुम्ही पुन्हा गुंतवता. तुम्ही पैसे किंवा लाभांश काढून घेतलात तर हेतू साध्य होणार नाही, म्हणूनच वृद्धि पर्याय निवडा.

## काय करू नये

**स्वैरपणे गुंतवणूक करू नका** - एसआयपीद्वारा स्वैरपणे गुंतवणूक करणे आतबट्ट्याचे ठरू शकते. उदाहरणार्थ, तुम्ही इक्विटी फंडांमध्ये एसआयपीद्वारा एका वर्षा साठी किंवा त्या जवळपास काळासाठी गुंतवणूक केलीत आणि त्या काळात बाजाराची कामगिरी चांगली झाली नाही, तर तुम्ही निराश व्हाल आणि तुम्हाला गुंतवणूक थांबवावी असे वाटेल. लक्षात ठेवा, इक्विटीसारख्या मालमत्ता वर्गाच्या कामगिरीचे निर्धारण करण्याचा हा तर्कसंगत मार्ग नाही. एसआयपीची परिणामकारकता किंवा ही यंत्रणा किती शक्तिशाली आहे हे त्यातून उमगत नाही. म्हणून तुमच्या गुंतवणूक उद्दिष्टांशी सांगड घालून एका सुनिश्चित कालक्षितिजात गुंतवणूक करा.

**घसरत्या बाजारात एसआयपी थांबवू नका** - एसआयपीद्वारा गुंतवणूक करण्याचे उद्दिष्ट बाजारातील अस्थिरता आपल्या फायद्यासाठी वापरण्याचे आहे. म्हणून जेव्हा बाजार घसरत असतो, तेव्हा गुंतवणूक करणे थांबवू नका. ध्यानात असू दे, शेअर बाजारात गुंतवणूक करण्याची हीच सर्वोत्तम वेळ आहे. म्हणूनच, तुम्ही तुमची गुंतवणूक ठरलेल्या काळासाठी सुरूच ठेवायला हवी, मग बाजाराची मनःस्थिती कशीही असो.

**एसआयपीद्वारा आक्रमकतेने गुंतवणूक करू नका** - ज्या रकमेची गुंतवणूक दरमहा करणे तुम्हाला काही काळानंतर अवघड जाईल अशा रकमेने एसआयपी सुरू करू नका. म्हणूनच, अंदाज घ्या आणि तुमच्या प्रत्येक उद्दिष्टासाठी तुम्ही किती रकमेने गुंतवणूक सुरू करू शकता ते ठरवा आणि सातत्य राखण्यासाठी रक्कम हळूहळू वाढवीत न्या. जर तुमच्या सर्व उद्दिष्टांसाठी गुंतवणूक करण्याइतके पैसे तुमच्याकडे नसतील तर, तुमच्या उद्दिष्टांचा अग्रक्रम ठरविणे आणि जास्त महत्त्वाच्या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करणे योग्य ठरेल.

**तुम्ही पैसे गमावणारच नाही असे नाही** - जरी एसआयपीद्वारा गुंतवणूक करण्याने तुम्हाला अस्थिरतेची जोखीम हाताळण्यास मदत होणार असली आणि दीर्घ मुदतीत त्याचा लाभ होणार असला तरी, अल्प मुदतीत फार वाईट किंवा ऋण उत्पन्न देणारे काळखंडही अनुभवाला येऊ शकतात. मात्र, तुम्ही हे ध्यानात ठेवायला हवे की अशा काळात केलेल्या गुंतवणुकीच बाजार सुधारल्यावर तुम्हाला भरघोस उत्पन्न देणार आहेत. म्हणूनच, अल्प मुदतीतील अस्थिरतेने विचलित होण्याऐवजी, तुमचे लक्ष दीर्घ मुदतीमधील परिणामांवर ठेवा.

**खूप जास्त फंडांमध्ये गुंतवणूक करू नका** - अनेक फंडांमध्ये गुंतवणूक करणे आतबट्ट्याचे ठरू शकते. म्युच्युअल फंड मुळातच विविधविस्तारित असतात म्हणून असे अनेक फंड घेतल्यास नको इतका विस्तार होण्याची शक्यता आहे. ध्यानात असूद्या, जास्त संख्येने फंड असलेल्या निवेशसंचावर देखरेख करणे कठीण असते आणि काही वाईट कामगिरी करणारे फंड एकंदर निवेशसंचाची कामगिरी खाली आणू शकतात.

---

**RISK FACTORS:** Mutual funds, like securities investments, are subject to market and other risks and there can be no assurance that the scheme's objectives will be achieved. As with any investments in securities, the NAV of units can go up or down depending on the factors and forces affecting capital markets. Please read the offer document before investing.

**जर तुम्ही एसआयपी सुरू करण्यास उत्सुक असाल तर तुम्ही आमच्या अंधेरी / ठाणे कार्यालयात संपर्क साधू शकता.**


## वाईजइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड

**(CIN No.: U74140MH2003PTC142921)**

**मुख्य कार्यालय**

**अंधेरी :** ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड,
अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३. टेलिफोन : २६७३ २६७१ / २६७३ २६७६.
इ-मेल : information@wiseinvest.co.in

**शाखा**

**ठाणे** : ५०२, पाचवा मजला, प्रतीभा बिल्डींग, तीन पेट्रोल पंप जवळ, पाचपाखाडी,
ठाणे (पश्चिम) - ४०० ६०२. टेलिफोन : २५३७ १५६७ / २५३९ १३०६.
इ-मेल : information1@wiseinvest.co.in